# छप्पर फाडके

"मी कदापि सूतपुत्राला वरणार नाही!"

द्रौपदीचा खणखणीत आवाज भर स्वयंवरात घुमला.

कर्ण धनुर्विद्येत तरबेज होता; अर्जुनाशी तुल्यबल होता. द्रौपदी-स्वयंवरातला पण तो लीलया जिंकू शकत होता. कर्णाची महत्त्वाकांक्षा आभाळाला भिडू पहात होती. त्याची गरुडझेप तिथवर सहज पोचलीही असती. पण ध्यानीमनी नसताना त्या झेपेला त्याच्या सूतकुळाचा अडथळा आला. द्रौपदीच्या एका वाक्याने त्याचं सारं कर्तृत्व कुचकामाचं ठरवलं! अपमानाच्या फटकाऱ्याने तो घायाळ झाला.

राजकारणी भाषेत अशा अडसराला 'ग्लास-सीलिंग' म्हणतात. त्या छताखाली रहाणाऱ्या माणसांची नजर उंच गगनाला गवसणी घालत रहाते. पण त्या आभाळाला हात लावायला त्यांनी वर चढायचं ठरवलं तर मात्र त्या पारदर्शक पण कठोर छतावर डोकं आपटून कपाळमोक्ष व्हायची पाळी येते. ही मर्यादा दुसऱ्यांनी घातलेली असते. आकाशात झेपावायला सर्व तयारीनिशी उडी घेईपर्यंत त्या ग्लास-सीलिंगचं अस्तित्वही जाणवत नाही.

काही प्रगत देशांत परकीय वंशाच्या माणसांना, पात्रता असूनही उच्चपदाचा मान नाकारण्याचा अलिखित नियम असतो. प्रत्यक्ष अन्याय होईपर्यंत त्या कर्तबगार परकीयांना त्या नियमाचा सुगावाही लागत नाही. जगभरात सगळीकडे सरकारदरबारात, मातब्बर व्यवसायांत पुरुषांचं वर्चस्व असतं. तिथे आपल्या कर्तृत्वाचा शिक्का उमटवू पहाणाऱ्या बाईला त्या काचेच्या छतावर आदळायचा अनुभव कधीनाकधी येतोच!

हे काचेचं छत निदान दुसऱ्यांनी लादलेलं असतं. त्याचं अस्तित्व कधीतरी ध्यानात येतंच. आणि मग हात आणि हातोडी सरसावताही येते. पण हे सारं जमायला आधी मान वर करून नभाकडे बघायची सवय असावी लागते.

ती सवयच लागू न देणारं दुसरं एक छत असतं – 'फॉल्स-सीलिंग'! आधीच फारशा उंच नसलेल्या हल्लीच्या खोल्यांत, छताखाली वीतभर अंतरावर बसवलेला, पुठ्ठ्यासारख्या प्लास्टरचा शोभिवंत थर! त्याने घर अधिकच खुजं होतं.  माणसं नकळत झुकतात; त्यांची ताठ मानेने चालायची सवयच जाते. नभाची उत्तुंग उंची तर त्यांना स्वप्नांतही दिसत नाही! . खरं तर साधं प्लास्टरचं, बुटकं छत. एका दमदार बुक्कीनेही फुटू शकेल असं! पण ती हिंमतच त्यांच्यात रहात नाही.

काही व्यक्ती स्वतःबद्दलच्या अपेक्षांना तसं फॉल्स-सीलिंग घालून खुजं करतात. त्यांना आत्मविश्वासच नसतो. ऑफिसर होण्याची कुवत असूनही 'मला सीनियर क्लार्कचं काम जमणारच नाही. मी त्या जागेसाठी परीक्षा देणारच नाही', म्हणत ती माणसं जन्मभर कनिष्ठ कारकुनाच्या खुर्चीला चिकटून रहातात. स्वतःच्याच क्षमतेला काल्पनिक मर्यादा घालून ते लोक सगळं आयुष्य त्या मर्यादांच्या कैदेत घालवतात.

न्यायमूर्ती रानड्यांच्या घरातल्या बायकांनी स्वतःला तसंच फॉल्स-सीलिंग घातलं होतं. ते रमाबाईंच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाने फोडलं. आता चंदा कोचरसारख्या बायकांनी तर काचेचं छतही भेदून वैश्विक आभाळात सूर मारला आहे.  सुनीता विल्यम्स अवकाशात झेपावली आहे.  महत्त्वाकांक्षेने शक्तिशाली पंख फैलावले की त्यांना कुठलंही छत अडवू शकत नाही.


डॉ. उज्ज्वला दळवी

-ujjwalahd9@gmail.com



(पूर्वप्रसिध्दी :  'मुंबई  सकाळ')